# <u>कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार घोषित</u>

कुसुमाग्रज अध्यासनाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्वाच्या अ-मराठी कवीला कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. .हा पुरस्कार २०१० पासून सुरू झालेला असून आतापर्यंत भारतीय कवितेत महत्वाची भर घालणाऱ्या चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मलयाळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी),सुरजीत पातर ( पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड) इत्यादी कवींना दिला गेलेला आहे. पुरस्कारार्थीला रोख रक्म एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह देण्यात येते.

यंदा २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी **अमिताभ गुप्ता** यांना आणि २०२३ चा पुरस्कार **नीलिम कुमार** याआघाडीच्या आसामी कवीला देण्यात आला आहे. अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले आसामी कवी नीलिम कुमार यांनी यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित असून त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत. या कवींची निवड मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी संगठीत केलेल्या समितीने केली आहे. समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले.

वरील दोन्ही कवींना पुरस्कार प्रदान करण्याचा कार्यक्रम लवकरच आयोजित करण्यात येईल असे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी कळवले आहे.